# प्रारंभ



# आरंभ



माझे आजोबा थोर स्वातंत्र्यसेनानी सहकार महर्षी स्व. भाऊसाहेब थोरात यांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून 23 वर्षांपूर्वी मी सामाजिक व राजकीय क्षेत्रात सक्रिय झालो. या 23 वर्षांच्या प्रवासात मला संघटनात्मक पातळीवर विविध क्षेत्रांत, विविध पदांवर काम करण्याची संधी मिळाली. संघटनेच्या कामासाठी मी देशाच्या जवळपास सगळ्या राज्यांमध्ये, तसेच महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात आणि तालुक्यात गेलो.

युवक काँग्रेस असो की जिल्हा परिषद, नेतृत्व करताना प्रचंड संघर्ष केला. या संपूर्ण प्रवासात मी काही कमावलं असेल तर ते म्हणजे प्रचंड मोठा मित्रपरिवार व अनुभव. ही अनुभवाची शिदोरी घेऊन मी पुढील झेप घेण्यासाठी सज्ज होतो, परंतु त्यासाठी हवी असणारी योग्य संधी मला मिळत नव्हती. अशा परिस्थितीत महाराष्ट्र विधानपरिषदेसाठी नाशिक पदवीधर मतदारसंघाची निवडणूक जाहीर झाली व नाट्यमय राजकीय घडामोडींनंतर मला ही निवडणूक लढवण्याची संधी मिळाली.

माझे वडील डॉ. सुधीर तांबे यांनी 3 टर्म या मतदारसंघाचं प्रतिनिधीत्व केलेलं असल्याने त्यांच्या कामाच्या माध्यमातून, त्यांच्या स्वभावाच्या माध्यमातून उत्तर महाराष्ट्रातील जनतेचं मन जिंकण्याचं काम त्यांनी केलं. तसेच उत्तर महाराष्ट्राच्या विकासासाठी देखील झोकून देऊन काम केलं. त्यांच्या आजवरच्या याच कामाची पावती आणि माझ्या प्रामाणिक प्रयत्नांना दाद देत या मतदारांनी माझ्यावरही प्रचंड विश्वास दर्शवत प्रचंड मताधिक्याने मला विजयी केले.

जनतेच्या आशीर्वादाने मिळालेल्या संधीचं सोनं करण्यासाठी आणि उत्तर महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासात खारीचा वाटा उचलण्यासाठी मी सातत्याने आणि जबाबदारीने प्रयत्नशील आहे. माझे मामा बाळासाहेब थोरात, वडील डॉ. सुधीर तांबे, आई दुर्गा तांबे यांच्या मार्गदर्शनाने विधानपरिषदेत महाराष्ट्रातील युवकांचा, सर्वसामान्य जनतेचा आवाज बनण्याचं काम मी प्रामाणिकपणे करतो आहे. या एक वर्षात मी काय काय करू शकलो आणि आणखी काय करण्याची गरज आहे याचा विचार मी करत असतो. याचाच लेखाजोखा मांडण्याचा हा प्रयत्न असून या टप्प्याला मी वर्षपूर्ती नाही, तर आरंभ मानतो ! मनातील अनेक संकल्पना राबविण्याच्या आणि संकल्प पूर्ण करण्यासाठीच्या नव्या पर्वाचा आरंभ !

सदैव आपलाच,

**सत्यजीत तांबे**

# भावना



गेल्या वर्षी झालेली नाशिक पदवीधर मतदारसंघाची निवडणूक राजकीयदृष्ट्या अतिशय गुंतागुंतीची झाली. निवडणुकीचा तो काळ आम्हा तांबे कुटुंबियांसाठी खूपच अवघड होता. परंतु आजवर सलग तीन वेळा माझ्यावर विश्वास ठेवून राज्याच्या सर्वोच्च सभागृहात आपले प्रतिनिधित्व करण्याची संधी दिलीत, त्यामुळे आपल्यात एक ऋणानुबंध निर्माण झालेला आहे. हाच विश्वास आपण सत्यजीतवर दाखवला आणि प्रचंड मताधिक्याने निवडून देत त्याला विधानपरिषदेत प्रतिनिधित्व करण्याची संधी दिली, याबद्दल मी आपणा सर्वांचा कायम ऋणी आहे.

माझ्या कार्यकाळात मी शिक्षण, आरोग्य, उद्योग, कृषी, दिव्यांग अशा विविध क्षेत्रांतील अनेक प्रश्न सोडविण्याचे प्रामाणिक प्रयत्न केले. जवळपास १४ वर्षे शिक्षकांसह विविध क्षेत्रातील पदवीधरांची सेवा करण्याची संधी मला मिळाली. ही धुरा आता सत्यजीत सक्षमपणे सांभाळतोय, याचा आनंद आहे. नाशिक पदवीधर मतदारसंघाचा आमदार म्हणून वर्षपूर्तीच्या निमित्ताने सत्यजीत आपल्या कामाचा लेखाजोखा मतदारांसमोर मांडतोय. सभागृहासह विविध माध्यमांतून जनतेचे प्रश्न मांडून ते सोडविण्यासाठी झटणाऱ्या सत्यजीतने एक आदर्श लोकप्रतिनिधी कसा असावा, याची चुणूक दाखवली आहे.

अभ्यासू वृत्ती, नेतृत्व गुण, नेतृत्व क्षमता, वक्तृत्व, संवाद कौशल्य, प्रचंड जनसंपर्क यांसोबतच विकासाबद्दलची तळमळ ही सत्यजीतची बलस्थाने आहेतच. पण यापूर्वी त्याने युवक काँग्रेस संघटनेत सुमारे २० वर्षे काम केलेले आहे. या माध्यमातून राज्यातील व देशातील विविध पक्षांमध्ये आणि नेत्यांसोबत जपलेले स्नेहाचे बंध देखील जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी नक्कीच साहाय्यभूत ठरत आहेत.

समाजातील युवक-युवती, महिला अशा विविध घटकांना उद्यमशीलता, रोजगार, आर्थिक व राजकीय साक्षरता अशा विविध विषयांवर योग्य दिशा दाखवण्यासाठीची सत्यजीतची धडपड त्याच्याबद्दल मित्रत्वाची भावना आणि तो विश्वास निर्माण करण्यास पूरक ठरते आहे.

सर्वसामान्यांच्या हितासाठी सत्यजीत एक-एक पाऊल विचार करून टाकतोय, कळकळीने काम करतोय हे मी गेल्या वर्षभरात बघत आलोय. वडील म्हणून मला त्याचा नक्कीच अभिमान आहे. यापुढेही तो असेच किंबहुना यापेक्षाही अधिक क्षमतेने काम करेल, अशी खात्री आहे. त्यासाठी माझ्या मनापासून शुभेच्छा!

धन्यवाद !

**डॉ. सुधीर तांबे**



# आभार दौरा

159 दिवस

5 जिल्हे

54 तालुके

50,000+ किमी प्रवास

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या नाशिक पदवीधर मतदारसंघाची निवडणूक अत्यंत धामधुमीत पार पडली. निवडणुकीच्या काळात जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचण्याचा माझा प्रयत्न होता परंतु ५ जिल्हे, ५४ तालुके आणि ४ हजार गावांपेक्षाही मोठ्या असलेल्या या मतदारसंघापर्यंत वैयक्तिकदृष्ट्या पोहोचणे, यावर मर्यादा होत्या. तरीही निवडणूक होताच मी आभार मानण्यासाठी मतदारसंघाचा दौरा केला आणि ही प्रक्रिया अजूनही निरंतर सुरूच आहे.

## एक वर्षाचा लेखाजोखा

**365**
एकूण दिवस

**37** दिवस
अभ्यास दौरा
(अमेरिका व इंग्लंड)

**38** दिवस
अधिवेशन कामकाज

**159** दिवस
आभार दौरा


**74** दिवस
मतदारसंघ दौरा व बैठका

**54** दिवस
मंत्रालयीन कामकाज


महोत्सवी वर्ष

# विधिमंडळ कामकाज

आर्थिक साक्षरता
शिक्षण
युवा
शहर विकास
इंजिनीअर्स
राजकीय साक्षरता
रोजगार
विद्यार्थी
शेतकरी
डॉक्टर
आरोग्य
पदवीधर
उद्योग
उत्तर महाराष्ट्र
उद्योजक
वकील



# विधिमंडळ कामकाज

| | | |
|---|---|---|
| एकूण अधिवेशनाचे दिवस 41 | माझी उपस्थिती 38 | लक्षवेधी सूचना 31 |
| मांडलेले तारांकित प्रश्न 198 स्वीकृत झालेले 72 | सर्वसाधारण अर्धा तास चर्चा मांडलेले प्रस्ताव 09 स्वीकृत झालेले 02 | मांडलेले अशासकीय ठराव 15 स्वीकृत झालेले 06 |
| मांडलेले औचित्याचे मुद्दे 31 स्वीकृत झालेले 18 | मांडलेले विशेष उल्लेख 31 स्वीकृत झालेले 18 | अल्पकालीन चर्चा 02 स्वीकृत झालेले 02 |



लोकमत

# युवा माहिती केंद्रासाठी एक कोटींचा निधी


निवेदन स्विकारताना आमदार सत्यजीत तांबे.

लोकमत न्यूज नेटवर्क

जळगाव : जळगाव शहरात युवा माहिती केंद्राची स्थापना होणार आहे. त्यासाठी एक कोटी व अमळनेर येथील सुप्रसिद्ध मंगळ ग्रह मंदिर परिसर सुशोभिकरण करण्यासाठी ३० लक्ष इतका निधी शासनाकडून मंजूर झाला आहे. त्याचा पाठपुरावा आमदार सत्यजीत तांबे यांनी केला. जिल्ह्यातील तब्बल ७५ शाळांना प्रत्येकी एक संगणकाचे वाटप सत्यजीत तांबे यांनी आपल्या आमदार निधीतून केले आहे. त्यांनी आमदार झाल्यानंतर जळगाव जिल्ह्याचा दौरा केला.

आमदार सत्यजीत तांबे हे आभार दौऱ्याच्या माध्यमातून भेट घेत आहेत. त्यांनी मुक्ताईनगर येथे ॲड. रोहिणी खडसे यांचीही भेट घेतली.

रविवारी बोदवड व मुक्ताईनगर शासकीय विश्रामगृह येथे डॉक्टर असोसिएशन, शैक्षणिक व पदवी संघटनांच्या पदाधिकारी व कार्यकर्ते यांची भेट घेतली.

# शिवछत्रपती पुरस्कारांच्या यादीत योगाचा समावेश

## आमदार सत्यजीत तांबे यांच्या पाठपुराव्याला यश

समर्थ भारत वृत्तसेवा

# जुनी पेन्शन योजना सुरु होईपर्यंत आंदोलन सुरूच राहणार : तांबे



# जळगाव शहरात अभ्यासिकेसाठी एक कोटीचा निधी

सत्यजित तांबेंचे प्रयत्न फळाला; आधुनिक माहिती केंद्र उभारले जाणार



लोकमत

# नाशिकसह पाच जिल्ह्यांत होणार युवा माहिती केंद्र

लोकमत न्यूज नेटवर्क

नाशिक : विभागातील नाशिकसह पाचही जिल्ह्यांमध्ये युवा माहिती केंद्रांची स्थापना होणार आहे. यातील धुळे, जळगाव, नंदुरबार जिल्ह्यांमध्ये युवा माहिती केंद्र उभारण्यासाठी प्रत्येकी एक कोटींचा निधी देण्याचा निर्णय घेतला आहे.

या माहिती केंद्रांमध्ये तरुणांच्या आयुष्यातील विविध समस्यांवर तोडगा काढला जाईल. अशाप्रकारचे केंद्र सुरू करण्यासाठी आमदार सत्यजित तांबे यांनी मागणी केली होती. या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत राज्य सरकारने मंजुरी दिली आहे. या माहिती केंद्रांमध्ये नोकरी, शिक्षण, उच्चशिक्षण आदी गोष्टींबाबत तरुणांना असलेल्या प्रश्नांची उत्तरे मिळण्याची तरतूद असेल. जगभरातील नोकरीच्या किंवा शिक्षणाच्या संधी, त्यासाठी आवश्यक पात्रता, राज्य व केंद्र सरकार यांच्याकडून दिली जाणारी मदत, अशा अनेक बाबींची माहिती या केंद्रात देणे शक्य होईल. तरुणांना ज्या क्षेत्रात रस आहे, अशा क्षेत्रांची, त्यातील संधींची माहितीही या केंद्राद्वारे त्यांना मिळेल. या केंद्रात को-वर्किंग स्पेस, वाचनालय अशा सुविधाही पुरवल्या जातील.

नाशिक जिल्ह्यात कुसुमाग्रज मराठी भाषा अभ्यास केंद्रासाठी ५० लाख रुपये देण्यात आले आहेत. तसेच जिल्ह्यात आदर्श शाळा उभारण्यासाठी ५० लाख रुपयांची तरतूद झाली आहे. शिवाय, मालेगावमधील उर्दू शाळांसाठीदेखील ५० लाखांचा निधी मंजूर झालेला आहे.

# श्रीगोंदा व संगमनेरमधील सरकारी रुग्णालयांचे बांधकाम पूर्ण करा!

## आ. सत्यजीत तांबे यांचे आरोग्य मंत्र्यांना आवाहन रुग्णालयात जाण्यासाठी ७० ते ८० किलोमीटर ग्रामस्थांची वणवण



पुढारी

# आयुर्वेदिक, होमिओपॅथी, डेंटलचा 'जनआरोग्य'त समावेश करा : आ. तांबे



आमदार सत्यजित तांबे : नागपूर हिवाळी अधिवेशनात मागणी

# पत्रकारांचे प्रश्न तातडीने मार्गी लावा



समर्थ भारत

# 42 हजार कंत्राटी कामगारांच्या आयुष्याशी खेळ नको : आ. सत्यजीत तांबे

## राज्यातील शेतकरी व कंत्राटी वीज कामगार न्यायाच्या प्रतीक्षेत!



लोकमत

उद्योगमंत्र्यांची माहिती : २६०० एकरचा भूखंड

# 'इंडिया बुल्स'ला दिलेला भूखंड परत घेणार



# वावीत ट्रॉमा सेंटर

## जिल्हा शल्यचिकित्सकांकडून सरकारकडे प्रस्ताव सादर

आरोग्यमंत्र्यांचे प्रस्तावाचे आदेश





# मेडिकल लॅबची वैधता तपासणारी यंत्रणा तयार करा : सत्यजीत तांबे

## मेडिकल लॅबवर कारवाया करून बोगस ठरवू नका

समर्थ भारत वृत्तसेवा



## मांडलेले मुख्य विषय

# आपला आवाज

सिन्नर तालुक्यातील सेझ प्रकल्पाअंतर्गत 'इंडियाबुल्स'ला देण्यात आलेली **2600 एकर जागा MIDC ने पुन्हा घेऊन नवउद्योजकांना द्यावी** अशी पावसाळी व हिवाळी अधिवेशनात मागणी

आपल्या प्रयत्नांतून सरकारने घेतलेल्या निर्णयामुळे महाराष्ट्रातील सर्व शिक्षकांना त्यांच्या **पसंतीच्या बँकेत पगाराचे खाते** उघडता येणार

शासकीय कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन देण्याच्या मागणीचे समर्थन व सातत्याने पाठपुरावा सुरु

आपल्या मागणीनंतर **'योगासने' या खेळाचा राज्य क्रीडा प्रकारात समावेश** खेळाडू शिवछत्रपती पुरस्कार व राज्य शासनाच्या विविध सुविधांसाठी पात्र ठरणार

आपल्या प्रयत्नातून वावी (ता. सिन्नर) डोळासणे (ता. संगमनेर) येथे **ट्रॉमा सेंटर मंजूर** होऊन कामाला सुरुवात

विशेष कृती कार्यक्रमातून **विदर्भ, मराठवाड्यातील मागास जिल्ह्यांचा अनुशेष दूर** करण्याबाबत मागणी

मुंबईत महिलांच्या सुरक्षेच्या मागणीनंतर रेल्वे प्लॅटफॉर्मवर 'पॅनिक बटण' लावण्याचा निर्णय

नाशिक-मुंबई महामार्गावरील वाहतूक कोंडीबाबत अधिवेशनात आवाज उठवला.

आपण आवाज उठविल्यामुळे राज्यातील महावितरण, महापारेषण, महानिर्मितीमधील **कंत्राटी कर्मचाऱ्यांना विमा सुरक्षा मिळणार**

मांडलेले मुख्य विषय

# आपला आवाज

दारूबंदी असलेल्या गडचिरोलीमध्ये मोहफुलाच्या दारूच्या कारखान्याचे उद्घाटन झाल्याने **व्यसनमुक्तीस धोका** निर्माण झाल्याचा प्रश्न हिवाळी अधिवेशन 2023 मध्ये उपस्थित केला

विदर्भातील **स्टील उद्योगाला सवलती** देण्याबाबत पाठपुरावा

सहकारी औद्योगिक वसाहतीतील बंद पडलेल्या उद्योगांच्या जमिनी घेऊन त्या नवउद्योजक व मागणी करणाऱ्या उद्योगांना देण्यासाठी **वैधानिक मार्गाने पाठपुरावा** सुरु

छत्तीसगड, राजस्थान इ. राज्यांप्रमाणे महाराष्ट्रात सुद्धा तरुणांना विशिष्ट कालावधीसाठी **बेरोजगारी भत्ता देण्याची** अधिवेशनात मागणी

विदर्भात सोयाबीन पिकावरील रोग, आदिवासी भागात **'टेलि मेडिसीन' सेवा, बालमृत्यू आदी प्रश्नांबाबत** पाठपुरावा

राज्यातील वेगवेगळ्या शासकीय पदांच्या परीक्षांमध्ये होणारे गैरप्रकार रोखण्यासाठी कायदा करण्याची मागणी

जीडीपीच्या दृष्टीने राज्यातील शेवटच्या 10 जिल्ह्यांचा विकास करण्याबाबत मागणी

राज्यातील विविध शासकीय परीक्षांच्या निकालांमध्ये होणारा विलंब रोखण्यासाठी कायदा करण्याची मागणी विधिमंडळात लावून धरली.

# विकासकामे

**1000+**
शैक्षणिक संकुल
व शाळांना
संगणकाचे वाटप

**5**
जिल्ह्यांमध्ये
युवक माहिती केंद्रांसाठी
रु. **10** कोटी

**22**
जयहिंद युथ क्लब
अभ्यासिका, वाचनालये,
स्पर्धा परीक्षा केंद्र यासाठी
रु. **15** कोटी

शिक्षण संस्थांच्या
विविध कामांसाठी
रु. **1** कोटी

शासनाच्या विविध
योजनांमधून विविध
कामांसाठी
रु. **10** कोटी

उत्तर महाराष्ट्रातील
पर्यटनाला चालना
देण्यासाठी
रु. **7** कोटी

*It's all about youth*

# YOUNNOVATION

**Youth Information & Innovation Center**

**2024 या वर्षामध्ये मी एक महत्वाकांक्षी योजना घेऊन येत आहे. त्या योजनेत उत्तर महाराष्ट्रातील पाचही जिल्ह्यांच्या ठिकाणी जिल्हा युवक माहिती केंद्राचे (Younnovation Center) चे काम सुरु झाले असून. निविदा प्रक्रिया सुरु झाली आहे.**

**यामध्ये**


Education
(शिक्षण)


Entrepreneurship
(उद्योजकता)



Employment
(नोकरी)



Essentials for Livelihood
(जीवनावश्यक मूल्ये)

**या बाबींवर भर दिला जाणार आहे.**


**300 ठिकाणी 'जयहिंद युथ क्लब' ची (वाचनालय, अभ्यासिका, स्पर्धा परीक्षा अभ्यासिका) निर्मिती करून प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी तयार होणाऱ्या Younnovation Center सोबत जोडण्याचा माझा मानस आहे. आता २२ 'जयहिंद युथ क्लब' चे काम प्रगतीपथावर आहे.**











# बैठका

- मा. मुख्यमंत्री व दोन्ही मा. उपमुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत जुन्या पेन्शन योजनेविषयी बैठक
- नाशिक-मुंबई महामार्गावर होणाऱ्या 'ट्रॅफिक जाम'विषयी मा. मुख्यमंत्री यांच्यासोबत बैठक
- सिन्नर, संगमनेर येथील ट्रॉमा केअर सेंटर, महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना याविषयी मा. आरोग्यमंत्री यांच्यासोबत बैठक
- सिन्नर येथील इंडिया बुल्सच्या प्रश्नांसंदर्भात मा. उपमुख्यमंत्री यांच्यासोबत बैठक
- महाराष्ट्रातील नागरी सहकारी पतसंस्थांच्या विविध प्रश्नांबाबत मा. सहकार मंत्री यांच्यासोबत बैठक
- शिक्षक आणि शाळांच्या विविध प्रश्नांसंबंधी मा. शालेय शिक्षण मंत्री यांच्यासोबत बैठक
- वरिष्ठ महाविद्यालयीन प्राध्यापकांच्या विविध प्रश्नांसंदर्भात मा. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांच्यासोबत बैठक
- होमिओपॅथिक डॉक्टरांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत मा. वैद्यकीय शिक्षण व विशेष सहाय्य मंत्री यांच्यासोबत बैठक
- वन्य प्राण्यांमुळे झालेल्या नुकसानीबाबत मा. वनमंत्री यांच्यासोबत बैठक
- उद्योजकांच्या प्रश्नांसंदर्भात नाशिक महापालिका आयुक्त यांच्यासोबत बैठक
- शिक्षण क्षेत्रातील विविध प्रश्नांसंदर्भात मंत्रालय पातळीपासून जिल्हा पातळीपर्यंत मागील एक वर्षात 14 बैठका घेतल्या









# विशेष पुढाकार

ज्या दिवशी महाराष्ट्र विधानपरिषदेचा सदस्य म्हणून मी शपथ घेतली, अगदी त्या दिवसापासूनच मी जनतेला उत्तरदायी असल्याची भूमिका प्रामाणिकपणे स्वीकारली. त्यामुळे माझ्या कामाचा लेखाजोखा जनतेपुढे मांडणे, त्यांच्या प्रतिक्रिया मागवणे आणि त्यानुसार काम करणे या प्रामाणिक उद्देशाने आपण ठरावीक टप्प्यांवर सर्व्हे करण्यास सुरुवात केली. 100 दिवस, 200 दिवस पूर्ण झाल्यानंतर आपण हे ऑनलाईन सर्व्हे केले आणि याला जनतेचा उत्तम प्रतिसाद लाभला. विशेष म्हणजे अशा प्रकारचा हा देशातील पहिलाच प्रयोग आहे.

**100**
दिवस पूर्ण झाल्यानंतर सर्व्हे
**11,620**
लोकांचा प्रतिसाद

**200**
दिवस पूर्ण झाल्यानंतर सर्व्हे
**20,000+**
लोकांचा प्रतिसाद

आता **365** दिवस झाल्याच्या निमित्तानेही सर्व्हे सुरू, यामध्येही आपण नक्की अभिप्राय नोंदवा.

अधिवेशनाआधी जनतेतून प्रश्न मागवणे, ते विधिमंडळात मांडणे आणि पुन्हा जनतेला उत्तरदायी असणे या कार्यपद्धतीचा अवलंब



राष्ट्रपिता महात्मा गांधीजी यांनी प्रबळ लोकशाहीसाठी 'रामराज्य' ही संकल्पना मांडली. लहान-मोठे, उच्च-नीच, सर्व प्राणिमात्र या सर्वांचा विचार करून, त्यांच्यामध्ये भेदभाव न करता राज्य केले पाहिजे. यासाठी त्यांनी ‘अंत्योदय’ ही संकल्पना मांडली. समाजातल्या अगदी शेवटच्या घटकाचा देखील उत्कर्ष व्हायला हवा, ही त्यामागील भावना होती. अगदी छोट्यातल्या छोट्या व्यक्तीला देखील न्याय देणारे राज्य म्हणजेच रामराज्य. महात्मा गांधीजींच्या याच संकल्पनेवर काम करणारा मी लोकप्रतिनिधी आहे. मी करत असलेल्या कामाचा लेखाजोखा लोकांसमोर मांडण्याचा माझा प्रयत्न होता. लोकांनी ज्या लोकप्रतिनिधींना निवडून दिलं, त्याला निर्भिडपणे प्रश्न विचारता आले पाहिजेत असं माझं ठाम मत आहे.

# सन्मान कर्तृत्वाचा

आदर्श
युवा आमदार
सन्मान
२०२४



आपल्या सर्वांच्या सहकार्याने व आशीर्वादाने गेल्या वर्षभरात केलेल्या कामाबद्दल मला MIT संस्थेच्या भारतीय छात्र संसदेकडून कर्नाटक विधानपरिषदेचे सभापती मा. श्री. बसवराज होराट्टी यांच्या हस्ते 'आदर्श युवा आमदार सन्मान - २०२४' हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

एक लोकप्रतिनिधी म्हणून माझा जो सन्मान झाला त्याचे सर्व श्रेय माझ्यावर विश्वासाने ही जबाबदारी सोपविणाऱ्या आपल्या सर्वांचे आहे, असे मी मानतो.

# जिव्हाळा






## संपर्क

401, Kalika Pride, Near Swasthya Hospital, Laltaki,
Ahmednagar, Maharashtra - 414001

Prabha, Indiranagar, Sangamner,
Dist. Ahmednagar, Maharashtra - 422605

+91 9822061332 office@satyajeettambe.com

Follow us on /satyajeettambe

**www.satyajeettambe.com**

© Satyajeet Tambe | All Rights Reserved